**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५४/५६/५७/५८/२०१८-१९/ 46 दिनांक: ०१.०३.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ५४ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार** :- मे. रंजीत टेक्टाईल,
गट क्र. ३४ प्लॉट क्र. ३
संजय औद्योगिक वसाहत
सांगली — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली — **पक्षकार**

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग सांगली

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग माधवनगर सांगली

------------X----------

**आदेश केस क्र. ५६ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार** - मे. रेखा टेक्टाईल,
गट क्र. ३४ प्लॉट क्र. ३
संजय औद्योगिक वसाहत
सांगली — **अर्जदार**

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

1/3/2019

विरुध्द

**पक्षकार**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग सांगली

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग माधवनगर सांगली

------------X-----------

**आदेश केस क्र. ५७ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार** :- मे. रंजना टेक्टाईल,
गट क्र. ३४ प्लॉट क्र. ३
संजय औद्योगिक वसाहत
सांगली

**अर्जदार**

विरुध्द

**पक्षकार**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग सांगली

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग माधवनगर सांगली

------------X-----------

REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.

**आदेश केस क्र. ५८ (२०१८-२०१९)**

**तक्रारदार** :- मं. अमोल टेक्टाईल,
गट क्र. ३४ प्लॉट क्र. ३
संजय औद्योगिक वसाहत
सांगली

**अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग सांगली

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग माधवनगर सांगली

**पक्षकार**

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. ताडे, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संयुक्त आदेश (common Order)**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.उपर निर्दिष्ट चारही ग्राहक तक्रारी एकाच स्वरुपाच्या असून त्यातील कायदयाचा मुद्दा व मागण्या या एकाच स्वरुपाच्या असल्याने हे चारही तक्रार अर्ज एकत्रिरित्या सुनावणी घेऊन हया सयुक्त आदेशाने निर्णित करण्यात येत आहेत.

1/3/2019

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) या सर्व तक्रार अर्जातील तक्रारदार उद्योजग असजून गट क्र. ३४ प्लॉट क्र.३ संजय औद्योगिक वसाहत माधवनगर सांगली येथे विविध नावानी वस्त्र उद्योग चालवतात त्याना विज वितरण कंपनीने तक्रार अर्जात नमूद केलेल्या स्वतंत्र ग्राहक क्रमांकानी लघुदाब औद्योगिक विज पुरवठा करण्यात आलेला आहे. सर्वच तक्रारदाराची एकच तक्रार अशी आहे की, गेले दोन वर्षापासून त्यांचा विज पुरवठा वारोवार खंडीत होत असून त्याचा त्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असून त्यांच्या उद्योगातील किंमती इलेट्रॉनिक साधन सामुग्रीचे नुकसान होत आहे. त्याबाबत विज वितरण कंपनीला वारोवार तक्रारी करुन देखील सुधारणा न झाल्याने तक्रारदारानी अंतर्गत तक्रार तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय सांगली यांचेकडे तक्रारी दाखल केल्या असता दिनांक ११.०१०.२०१८ चे आदेशाने अंतर्गत कक्षाने तक्रारदाराचा विज पुरवठा अखंडीत ठेवणे संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात यावी असा आदेश पारित करुन सुध्दा परिस्थितीत काहीही बदल न झाल्याने तक्रारदाराना प्रस्तुतची तक्रार दाखल करावी लागली अशी तक्रारदाराची तक्रार आहे. तक्रारदारांनी विज पुरवठा खंडीत होण्याकरिता त्वरीत योग्य ती कारवाई करण्याचे विज कंपनीला आदेश व्हावेत अशी मागणी हया सर्व तक्रारीमध्ये केलेली आहे.

३) प्रस्तुत प्रकरणाची नोटीस बजावल्यानंतर विज वितरण कंपनीने अतिरिक्त कार्यकारी अभियंता माधवनगर उपविभाग सांगली यांच्या मार्फत हजर होऊन खालील प्रमाणे म्हणणे चारही तक्रार अर्जात दाखल केलेले आहे.

मे. अमोल टेक्स्टाईल, मे. रंजना टेक्स्टाईल्स, मे. राजनिल टेक्स्टाईल्स व मे. रेखा टेक्स्टाईल्स हे माधवनगर येथील संजय इंडस्ट्रीयल इस्टेट मध्ये ग्राहक असून ३३/१ के.व्ही. माधवनगर उपकेंद्रामधून निघणा-या ११ के.व्ही. कॉटन मील फीडर वर आहेत. माहे एप्रिल, मे व जून २०१८ मध्ये २२० के.व्ही. मिरज उच्च दाब उपकेंद्र मधील ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड तसेच ट्रान्सफॉर्मर वाइंडिंगच्या तापमान वाढिमुळे ३३ के.व्ही. माधवनगर फीडर वर ट्रिप्रिग आले होते. करिता सांगली ग्रामिण ३३ के.व्ही. बेडग व मल्लेवाडी उपकेंद्र हे नव्याने कार्यवाहीत होणा-या २२० के.व्हीज नरवाड अति उच्च दाब उपकेंद्रामधून निघणा-या ३३ के.व्ही. लाईन वर जोडण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे सदर उपकेंद्र दिनांक १०.०९.२०१८ रोजी त्या लाईन वर घेण्यात आले आहे.

२२० के.व्ही. उच्च दाब उपकेंद्र मिरज येथून येणारा ३३के.व्ही. माधवनगर फिडर. तसेच माधवनगर उपकेंद्रास ११० के.व्ही. विश्रामबाग उच्च दाब उपकेंद्रातून ३३ के.व्ही. माधवनगर फिडर वर घेण्याची व्यवस्था आहे. परंतु वरील कालावधीमध्ये या उच्च दाब उकेंद्रामधून निघणा-या ३३ के.व्ही. सांगली सिटी फिडरच्या ओवरलोडींगमुळे काही टॅपिंग आले होते याकरिता विभागीय कार्यालयाकडून फिडर सेपरेशनचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास पाठविण्यात आलेला आहे.

३३ के.व्ही. माधवनगर उपकेंद्राला २२० के.व्ही. मिरज तसेच ११० के.व्ही. विश्रामबाग या दोन्ही उच्च दाब उपकेंद्राकडून वीज पुरवठा करणा-या वाहिन्यांच्या देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली असून दोन्ही वाहिन्या सुस्थितीत आहेत ११ के.व्ही. कॉन मं. फिडरवर कोणतीही झाडेझुडपे नसून ती वाहिनी सुस्थितीत आहे या लाईनवरील असणारे लुजगाळे पुन्हा ओढून घेण्यात आलेले आहेत तसेच आवश्यक ठिकाणी गार्डिग करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे ३३ के.व्ही. माधवनगर उपकेंद्रातील सर्व प्रकारचे मेंटेनन्स व ओव्हर हाऊलींगची कामे करण्यात आलेले आहे.

1/3/2019

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तसेच या कामी कॉटन मिल वरील लोड कमी करण्याकरिता दिनांक ०८.०८.२०१८ रोजी इंडोटेक्स फिडर चालू करण्यात आला व कॉटन मिल वरील काही लोड इंडोटेक्स फिडरवर टाकण्यात आला आणि दिनांक २०.०३.२०१८ रोजी पत्रा डेपो नावाचा फिडर चालू करुन पुन्हा कॅाटन मिल वरील काही लोड पत्रा डेपो फिडरवर शिफ्ट केला आहे त्यामुळे सध्या कॉटन मिल फिडर पुन्हा कॉटन मिल वरील काही लोड पत्रा डेपो. फिडरवर शिफ्ट केला आहे. त्यामुळे सध्या कॉटन मिल फिडर लोड पूर्वीपेक्षा कमि आहे.

२२० के.व्ही. उच्च दाब उपकेंद्र मिरज मधून येणारा ३३ के.व्ही. माधवनगर फिडर चाकण उपकेंद्रामध्ये लाईन इन व लाईन आऊट होतो सदरचे चाकण उपकेंद्र हे मानव विरहित आहे व ते स्काडा सेंटरच्या अखत्यारित आहे. चाकण उपकेंद्रामधील ११ के.व्ही. किंवा ३३ के.व्ही. फिडर हे फॅाल्टी झ ााल्यास त्या उपकेंद्रामधील इन्कमर ट्रिप होतो. त्यामुळे ३३ के.व्ही. माधवनगर फिडर ही बंद होतो व सदरचा फिडर उपकेंद्रामध्ये स्काडाचे यंत्र चालक आल्याशिवाय चालू होत नाही. कारण चाकण उपकेंद्र हे स्काडा सेंटर माधून ब-याच वेळा ऑफ लाईन असते. त्यामुळे जितका वेळ यंत्र चालकाला येथे पोहोचण्यास लागतो तितका वेळ सदर उपकेंद्रामध्ये बंद असलेल्या फीडर्स बंद राहतात.

दिनांक ०७.१२.२०१८ रोजी सकाळी ७ वाजता ३३/११ के.व्ही. माधवनगर उपकेंद्रामधील ५ MVA पॅावर ट्रान्सफॅार्मरमध्ये बिघाड झाला होता त्यामुळे ५ MVA पॅावर ट्रान्सफॅार्मर वरील सर्व फिडर १० MVA पॅावर ट्रान्सफॉर्मरवर जोडण्यात आले आहेत.

तरी सध्या स्काडा सेंटरमधून चाकण उपकेंद्र ऑनलाईन झाले असल्याने व वरील सर्व कामे करुन घेतली असल्याने सध्या लाईनवर कोणताही फॅाल्ट होत नाही.

अशा कथनांवरुन प्रस्तुत तक्रार खारीज करावी अशी मागणी विज वितरण कंपनीकडून करण्यात आलेली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी भवरलाल लडा तक्रारदार हजर होते. विज वितरण कंपनी तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री व्हनमोरे हजर होते. त्यांचे युक्तीवाद ऐकून घेण्यात आले

५. उभय प्रकरणी आमच्या निष्कर्षाकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | उभय तक्रारदाराच्या मागण्या मंजूर होण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

MER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

६. मुद्दा क्रमांक १ व २ :- विज ग्राहकांला अविरत व अखंडीत विज पुरवठा मिळण्याचा अधिकार आहे. याबाबत विज वितरण कंपनीचा काही उजर नाही. ही कायदयाची ठाम बाजू आहे. तथापि तक्रार अर्जातील कथने किंवा वि.प कंपनीच्या लेखी म्हणण्यातील मुद्ये तसेच श्री व्हनमोरे यांनी या मंचासमोर आपल्या युक्तीवादात सादर केलेला तांत्रिक माहिती वरुन तक्रारदाराचा वारोवार खंडीत होणारा विज पुरवठा ते तंत्रिक बाब असून त्याकरिता कोणताही मानवी हस्तक्षेप किंवा यांत्रिक बिघाड असल्याचे दिसून येत नाही. विजपुरवठा खंडीत होण्याकरिता विविध तांत्रिक बाबी ज्या, मानवी हस्तक्षेपाच्या पलीकडे असतात अशा देखिल असू शकतात त्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने पारित आदेशाशिवाय इतर कोणताही वेगळा आदेश या प्रकरणात हे मंच देवू शकत नाही. विजवितरण कंपनीने सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये जी उपाय योजना केल्याचे नमूद केलेले आहे, ती उपाय योजना पर्यायाप्त असून त्या पलीकडे इतर काही आदेश पारित करता येत नाहीत. असा यामंचाचा सर्व तांत्रिक बाबीचा विचार करुन झालेला निष्कर्ष आहे. तथापि विज ग्राहकांचा वर नमूद केलला कायदयशिर हक्क लक्षात घेता त्याचा विज पुरवठा अखंडीत स्वरुपात चालू ठेवण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना एका विविध कालावधीत करण्याचे आदेश देऊन त्या उपाय योजनाचा अहवाल या मंचाला सादर करावा असा आदेश पारित करणे योग्य राहिल असा या मंचा निष्कर्ष आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थीत देत आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

## आदेश

१) तक्रार अर्ज ५४/(२०१८-१९),५६/(२०१८-१९), ५७/(२०१८-१९) व ५८(२०१८-१९) तक्रार अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२) तक्रारदार ग्राहकांचा अखंडीत ठेवण्या संदर्भात आवश्यक ती योग्य कारवाई करुन केलेल्या कारवाईचा अहवाल या आदेशाचे तारखेपासून दोन महिन्याचे आंत या मंचाला सादर करावा असा आदेश विज वितरण कंपनीला देण्यात येत आहे.

३) या आदेशाच्या मुळ प्रत तक्रार क्रमांक ५४(२०१८-१९) मध्ये ठेऊन त्याची सांक्षाकीत प्रत तक्रार क्रमांक. ५६/(२०१८-१९), ५७/(२०१८-१९) व ५८(२०१८-१९) मध्ये ठेवावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

1/3/19 1/03/19 1/3/2019

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. पुजारी) | (एन.के. ताडे) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण